# 'मेट्रो ३' मार्गिकेतील भूखंडांचा व्यवसायिकदृष्ट्या विकास

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेतील भूखंडांचा व्यवसायिकदृष्ट्या विकास करण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) घेतला आहे. त्यानुसार पाच भूखंडांच्या विकासाठी मालमत्ता बाजारपेठ मूल्यांकनासाठी आणि आर्थिक व्यवहार्यता ठरवण्याकरिता स्वारस्य निविदा मागविल्या आहेत. या भूखंडांच्या विकासाच्या माध्यमातून उत्पन्नाचा स्रोत निर्माण करण्याचे एमएमआरसीचे उद्दिष्ट आहे.

मेट्रो ३च्या ३३.५ किमीच्या मार्गादरम्यान एमएमआरसीला राज्य सरकारकडून काही भूखंड उपलब्ध झाले आहेत. त्यांचा विकास करून भविष्यात उत्पन्न मिळविण्याचा एमएमआरसीचा प्रयत्न आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात पाच भूखंडांच्या विकासाचा निर्णय एमएमआरसीने घेतला आहे. मुंबईतील जागांचे महत्त्व लक्षात घेता मालमत्ता बाजारपेठेच्या अनुषंगाने भूखंडांचे मूल्यांकन करण्यासाठी तसेच आर्थिक व्यवहार्यता ठरविण्यासाठी या क्षेत्रातील इच्छुक कंपन्यांकडून एमएमआरसीने स्वारस्य निविदा मागविल्या आहेत. त्यानुसार निवड केलेली कंपनी सल्लागार म्हणून भूखंडांच्या विकासासाठी आवश्यक ते सहाय्य करणार आहे. निविदेनुसार पाच भूखंडांचा विकास करण्यात येणार आहे.

एमआयडीसी मेट्रो स्थानकानजीकच्या ४,५८६ चौ. मीटर, धारावी स्थानकानजीकचा ४२० चौ. मीटर, मरोळ नाका मेट्रो स्थानकानजीकचा ८९५ चौ. मी., महालक्ष्मी मेट्रो स्थानकानजीकचा ३,५१५ चौ.मीटर आणि माहीम नयानगर येथील ३२७८ चौ. मीटर जागेचा यात समावेश आहे.